# १०. ससोबा

- **ऐका. म्हणा. कृती करा.**

ससा रे ससा.
असा रे कसा ?
ताठ असती तुझे कान.
तोंडावरती मिश्या छान.
डोळे तुझे लाल लाल.
गुबगुबीत तुझे गाल.
अंग तुझे पांढरे पांढरे,
दिसे किती छान गोजिरे.
शेपटी तुझी इवलीशी,
हालवतोस अशी कशी ?
गवत खातो कुरुकुरु.
चालतोस तू तुरुतुरु.
चाहूल लागता थोडीशी,
मारतोस तू दडी कशी ?
असा रे कसा,
भित्रा तू ससा ?

**– बालाजी बिरादार**





- **ऐका. म्हणा.**

(अ) सशाचे कान – ताठ
(आ) सशाचे डोळे – लाल लाल
(इ) सशाचे गाल – गुबगुबीत
(ई) सशाचे अंग – पांढरे पांढरे
(उ) सशाची शेपटी – इवलीशी
(ऊ) सशाच्या मिश्या – छान

- **एकच शब्द दोन वेळा वापरून तयार झालेले शब्द या कवितेत आले आहेत.**

**उदा.,** लाललाल. असे तुम्हांला माहीत असलेले शब्द सांगा.

**शिक्षकांसाठी :** गाणे तालासुरात, साभिनय म्हणून दाखवावे. गाण्याची एकेक ओळ म्हणावी. विद्यार्थ्यांना मागे म्हणण्यास सांगावे. विद्यार्थ्यांना स्वत:बरोबर गाणे म्हणण्यास सांगावे. वर्गाबरोबर, गटात व वैयक्तिकरीत्या गाणे तालासुरात, साभिनय म्हणून घ्यावे. कवितेखाली दिलेले 'ऐका. म्हणा.' यावर प्रश्न विचारावे.